# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १६/०४/२०२३ (रविवार)

---

## दुखापत

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— अंतर्गत मौजा जाटलापुर ७ किमी दक्षिण. दिनांक १४/४/२३ चे २०/०० वा यातील आरोपी नामे— १) प्रभाकर महादेव नेहारे वय ३५ वर्ष २) प्रभाकरचा मित्र नाव माहित नाही दोन्ही रा कामठी मासोद ता काटोल जि नागपुर यांनी फिर्यादीस विनाकारण काही न बोलता विनाकारण हातबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करून मारून टाकतो ? अशी धमकी दिली व आरोपी क्र १, याने खाली पडलेला दगड उचलुन फिर्यादी याचे उजव्या डोळ्याचे भोईजवळ मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर कृश्णराव घागरे वय ५५ वर्ष रा मासोद ता काटोल जि नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरूध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो हवा दारासिंग राठोड मो क्र. ९८६०४२७९०२ हे करीत आहे.